स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



# Office of the Controller of Examinations

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

जा.क्र.पनिका/उन्हाळी २०१६परीक्षा/विलंबशुल्क/२०१५-१६/ ४६१८ दिनांक : २५/०२/२०१६.

## सुधारित परिपत्रक

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नीत महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **उन्हाळी २०१६ परीक्षेच्या विलंब शुल्काबाबत.**
संदर्भ :परीक्षा/२०१५-१६/४३२८, दि. १०/०२/२०१६.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी २०१६ परीक्षेचे बी.ए, बी.कॉम व बी.बी.ए प्रथम वर्ष व तृतीय वर्षाच्या परीक्षेचेआवेदनपत्र सादर करण्याची अंतिम तारीख २०/०२/२०१६. होती. महाविद्यालयांनी धनाक र्ष काढण्याची अंतिम तारीख दि. २२/०२/२०१६ रोजी होती व विद्यापीठात सादर करण्याच्या विविध तारखा जिल्हानिहाय देण्यात आलेले आहेत. वरील तारखेनंतर दि. २२/०२/२०१६ ते दि. २९/०२/२०१६ पर्यंत **प्रतिविद्यार्थी प्रतिदिन १००/- रु.** प्रमाणे हे अर्ज विलंबशुल्कासह परीक्षा आवेदपत्र महाविद्यालयातच स्विकारुन त्याचा धनाकर्ष दि. ०१/०३/२०१६ रोजी काढुन विद्यापीठात दि. ०२/०३/२०१६ रोजी सादर करावेत. उन्हाळी २०१६ च्या परीक्षेकरीता प्रस्तुत विद्यापीठाच्या परिक्षेत्रात दुष्काळी परिस्थीती निर्माण झाल्यामुळे वरील विलंब शुल्क ाची आक ारणीची क ार्यपध्दती महाविद्यालय स्तरावर करण्याची मान्यता देण्यात येत आहे, जेणेकरुन विद्यार्थ्यांना विद्यापीठात विलंब शुल्क भरण्यासाठी व येणे-जाण्यासाठी खर्च व वेळेचा अपव्यय व गैरसोय टाळता येईल. महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्रासोबत विलंब शुल्क महाविद्यालयात भरल्याचा पुरावा , पावतीचा दिनांक पुरावा जोडणे आवश्यक आहे. वरील कालावधीनंतर म्हणजे दि. २९/०२/२०१६ नंतर जे विद्यार्थी महाविद्यालयात विलंब परीक्षा अर्ज सादर करतील त्यांचे अर्ज महाविद्यालयांनी शिफारस पत्रासह परीक्षा विभागात पाठवावेत. वरील सुविधा हि केवळ विलंब शुल्कासह आवेदनपत्र सादर करण्यासाठी आहे. **मात्र यापुर्वी दिलेल्या आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेत कोणताही बदल नाही याची नोंद घ्यावी.**

सबब, उपरोक्त बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणुन परीक्षा विभागास सहकार्य करावे.

आपला,

परीक्षा नियंत्रक

**प्रत माहितीस्तव सादर :**
मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
कार्यालयीन अधीक्षक, सर्व विद्याशाखा, परीक्षा विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.